# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/09/2023 (शनिवार) दुपार

---

## घरफोडी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत विर सावरकर नगर फेजवन प्लॉट नं. ६३ बुट्टीबोरी येथे दिनांक २५/०९/२०२३ चे १३.०० वा. ते दिनांक २८/०९/२०२३ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– देवानंद चुन्नीलाल भास्कर, वय ५६ वर्ष रा. वडेगाव जि. गोंदिया ह. मु. विर सावरकर नगर फेजवन प्लाट नं. ६३ एम. आय. डी. सी बुट्टीबोरी हा मुळगावी येथे गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने घराला लावलेले कुलूप उघडून घरात प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले १) एक सोन्याची ४.५० ग्रॅमची चैन अंदाजे किंमतीं १०,०००/– रू. २) सोन्याचा गोप ९ ग्रॅम अंदाजे किंमती १५,०००/–रू. ३) सोन्याचे कानातले १ ग्रॅम अंदाजे किंमती १५००/–रू. ४) सोन्याच्या बांगडया २५ ग्रॅम अंदाजे किंमती ७,५००/– रू ५) चांदीचे पायातले चाळ १६० ग्रॅम किंमती १,०००/– रू ६) सोन्याचे अंगठयाचे ५ नग प्रत्येकी २.५० ग्रॅम अंदाजे किंमती ४,०००/–रू ६) मंगळसुत्र १० ग्रॅम किंमती १५,०००/– रू. एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये बि. एस. एन. एल. चे सिमकार्ड असलेला किंमती १०००/– रू. असा एकुण ५५,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात ईसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४५४, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक वाघ पोलिस स्टेशन बोरी मो. नं. ९८२२८५२५०१ हे करीत आहे.

## मोबाईल चोरी

पो.स्टे. भिवापूर :– अंतर्गत १/२ किमी अंतरावर मौजा भिवापूर आठवडी बाजार येथे दिनांक २९/०९/२०२३ चे ०४.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– सुर्यभान रामचंद्र मोहोड, वय ४८ वर्ष, रा. बोर्डेकला ता. भिवापूर हा आठवडी बाजार करण्या करीता गेला असता फिर्यादीच्या शर्टच्या वरच्या खिशातील ओप्पो ए १७ कंपनीचा मोबाईल फोन किंमती १६०००/– रू. हा काढुन घेतला असता फिर्यादी पोलीस स्टेशन भिवापूरला रीपोर्ट देण्याकरीता आले असता काही लोकांनी दोन संशयीत **इसम नामे– १) सचिन जवारसिंग चव्हान वय ३२ वर्ष रा. मांडवी ता. कळमेश्वर जि. नागपुर २) विधीसंघर्ष बालक** यांना पकडुन पोस्टे भिवापूरला आणले असता त्यांच्या ताब्यातुन फिर्यादी यांचा मोबाईल मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपींविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली असुन २) विधीसंघर्ष बालक याला पालकांच्या ताब्यात देण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार आनंद धात्रक पोस्टे भिवापुर मो. क्र. ९५४५३५५४७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर